पुढारी

# 'ससून'ला मिळालेल्या उपकरणांचा रुग्णांना होणार लाभ

## 'फिनोलेक्स-मुकुल माधव फाउंडेशन'चा उपक्रम

**पुणे : प्रतिनिधी**

फिनोलेक्स इंडस्ट्रीच्या मुकुल माधव फाउंडेशनकडून ससून रुग्णालयाला दोन कोटी रुपयांची अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे भेट देण्यात आली. नवजात शिशु अतिदक्षता विभागाच्या (निओनेट इन्टेन्सिव्ह केअर युनिट- एनआयसीयु) दुसऱ्या, तर एंडोस्कोपी युनिटच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त १६ एप्रिलला या उपकरणांचे औपचारिक उद्घाटन होणार आहे.

एंडोस्कोपी विभागात किरणांपासून बचावासाठी अल्ट्रा साउंड विथ हेड प्रोटेक्शन, थायरॉईड शिल्ड, लीड ॲप्रॉन, प्रोटेक्टिव्ह आय गिअर्स, ओजिडी स्कोप आदी उपकरणांचा समावेश आहे. तर एनआयसीयूमध्ये अत्याधुनिक सेंट्रल एअर प्रेशर, ब्लड गॅस ॲनालायझर, ब्रेथ ॲनालायझर व इतर उपकरणांचा समावेश आहे. ससूनमध्ये एप्रिल २०१७ मध्ये ५९ खाटांचा एनआयसीयू कक्ष, तर मार्च २०१८ मध्ये एंडोस्कोपी कक्ष सुरू करण्यात आलेला आहे.

तसेच 'मुकुल माधव फाउंडेशन'कडून ससून रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी सर्व सोयींनी युक्त असे तीन सुसज्ज विश्रांती कक्ष उभारण्यात आले आहेत. दहा लाख रुपयांच्या निधीतून आधुनिक लेसर मशिनद्वारे दंतरोपण सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. अशा प्रकारचे दंतचिकित्सा करणारे हे पहिलेच शासकीय रुग्णालय आहे. डायबेटीस, यकृत प्रत्यारोपण आणि नेत्रोपचार सेवा देण्यासाठी फाउंडेशन प्रयत्नशील आहे. तसेच १०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकाही उभारण्यात आली आहे, अशी माहिती मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी दिली. दरम्यान, ससूनमधील एनआयसीयूमुळे गेल्या दोन वर्षांत ५२०० बाळांवर मोफत उपचार करण्यात आलेले आहेत. तर एंडोस्कोपीमार्फतही केवळ ३५० ते ११५० रुपयांत हजारो रुग्णांना उपचार मिळाले आहेत.